क्र.ठामपा/निवि/आयुक्त-८५१ दि.११ - ०१-२०१७

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## जाहीर सूचना

## ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०१७

## प्रभाग निहाय प्रारुप मतदार याद्या प्रसिध्दीबाबत

मा.राज्य निवडणूक आयोगाने **पत्र क्र.रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.४८/का-५ दिनांक २२-११-२०१६ अन्वये जाहिर केलेल्या कार्यक्रमानुसार दि.०५/०१/२०१७ रोजी मा.भारत निर्वाचण आयोगाने प्रसिध्द केलेल्या १४४ कल्याण ग्रामिण, १४६ ओवळा-माजिवडा, १४७ कोपरी पाचपाखांडी, १४८ ठाणे, १४९ मुंब्रा-कळवा या विधानसभेच्या ठाणे महानगरपालिका हद्दीतल मतदार यादी प्रभाग निहाय विभागून ठाणे** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग मतदार याद्या दिनांक १२-०१-२०१७ रोजी प्रसिध्द् करण्यात आल्या आहेत.

दिनांक १२-०१-२०१७ ते दिनांक १७-०१-२०१७ या कालावधीत खालील मुद्यांवर नागरिकांकडून सदर प्रारुप प्रभाग मतदार यादीवर हरकती व सूचना मागविण्यात येत आहेत.

१) लेखनिकांच्या काही चूका असल्यास त्या सुधारणे. २) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असल्यास ते वगळणे. ३) प्रभागांच्या भौगोलिक हद्दीप्रमाणे विधानसभा मतदार संघाच्या यादीत नाव असूनही महापालिका प्रभागाच्या मतदार यादीत नावे वगळली गेली असल्यास त्याचा समावेश प्रभाग मतदार यादीत करणे.

उपरोक्त मुद्यांवरील लेखी हरकती व सूचना महापालिकेच्या खालील पत्त्यावर विहीत मुदतीत सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळत स्विकारण्यात येतील. वरील नमुद मुद्यां व्यतिरिक्त अन्य मुद्यांवरील हरकती व सुचना स्विकारल्या जाणार नाहीत. तसेच उपरोक्त मुद्या व्यतिरिक्त आणि मुदतीनंतर दाखल झालेल्या हरकती व सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत. या करीता मुदतीत हरकती दाखल कराव्यात.

| अ.क्र. | नवीन प्रभाग क्रमांक | संबंधीत प्रभागांबाबतच्या मतदार यादीतील हरकती दाखल करण्याचे कार्यालय. |
|---|---|---|
| ०१ | १,२,३,८ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त माजिवडा प्रभाग समिती. |
| ०२ | ४,५,७ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त वर्तकनगर प्रभाग समिती. |
| ०३ | ६,१३,१४ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त लोकमान्य/सावरकरनगर प्रभाग समिती. |
| ०४ | १०,११,१२ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त उथळसर प्रभाग समिती. |
| ०५ | १५,१६,१७ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त रायलादेवी प्रभाग समिती. |
| ०६ | १८,१९ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त वागळे प्रभाग समिती. |
| ०७ | २०,२१,२२ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त नौपाडा प्रभाग समिती. |
| ०८ | ९,२३,२४,२५ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त कळवा प्रभाग समिती. |
| ०९ | २६,३०,३१,३२ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त मुंब्रा प्रभाग समिती. |
| १० | २७,२८,२९,३३ | सहाय्यक पदनिर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त दिवा उपप्रभाग समिती. |

उपरोक्त नमूद तक्त्या प्रमाणे संबंधित प्रभागांच्या मतदार यादी वरील हरकती या फक्त वरील तक्यात नमूद सहाय्यक निर्देशित अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (संबंधीत प्रभाग) यांचे कार्यालयात दाखल कराव्यात त्या व्यक्तिरीक्त अन्य ठिकाणी अन्य कार्यालयात दाखल केलेल्या,तसेच लेखी, हार्ड कॉफी स्वरुपात दाखल केल्या नसतील तर (मेल व्दारे दाखल केलेल्या) हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

प्रस्तूत प्रभागांच्या प्रारुप प्रभाग मतदार याद्या www.thanecity.gov.in या वेबसाईटवर आणि निवडणूक विभाग (मुख्यालय), आणि सर्व प्रभाग समिती कार्यालये येथे पाहण्यासाठी प्रसिध्द् करण्यात येत आहेत. सदर मतदार याद्या महापालिका मुख्यालयातील आगाऊ मागणी नोंदविल्यास नागरी सुविधा केंद्र येथे विक्रीसाठी उपलब्ध केल्या जातील.

**(संजीव जयस्वाल)**
महापालिका आयुक्त
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रत :- सहाय्यक आयुक्त, सर्व प्रभाग समिती.
सर्व प्रभाग समिती कार्यालयात व संबंधित नवीन प्रभागांमध्ये ठळक ठिकाणी प्रसिध्द करण्यासाठी.